www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 167 वार सोमवार दि. 03 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## जिल्हा परिषद शाळा सोनेवाडी येथे स्नेहसंमेलन

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

जि प शाळा सोनेवाडी बु येथे शुक्रवार दि. २८/२/२०२५ रोजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनात विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली असून विविध मनोरंजन, सांस्कृतिक,लोकगीते, देशभक्ती इत्यादी गीतांवर नृत्ये ,कविता सादरीकरण,नकला,नाटक अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांनी उपस्थित मंत्रमुग्ध झाले. माझा शिवबा ग हे समूहनृत्य कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.कार्यक्रमाचे उद्घाटन सोनेवाडी बु. गावच्या सरपंच संजीवनी सोमनाथ पडोळ यांच्या हस्ते करण्यात आले, असून प्रमुख पाहुणे म्हणून सोनेवाडी माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन रजनीताई कचेश्वर पडोळ,सदस्य माधवराव निचित, पोलिस पाटील अभिजित पडोळ उपस्थित होते. तसेच केंद्रप्रमुख देवयानी आहेर, विस्तार अधिकारी लता भरसट यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रावसाहेब पडोळ, उपाध्यक्ष प्रताप पडोळ,सदस्य जनार्दन पडोळ,अरुण जाधव,शरद निचित, रविंद्र पडोळ. तसेच स्नेहसंमेलन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विनायक आहेर,शिक्षक विकास मुळे, बालासाहेब लांडगे, संभाजी काकडे,प्रतिभा वसावे,स्वप्ना बर्वे,शुभांगी निरभवणे यांनी विशेष प्रयत्न केले.




## उघड्या चेंबरमध्ये पडुन इसम जखमी

**दै युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख**

उल्हासनगर नंबर 4 परिसरामध्ये एका उघड्या चेंबरमध्ये पडुन एक/57/वर्षीय इसम गंभीर जखमी झालेल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे महनगरपालीकेच्या बेजबाबदारपणे मुळेच हा अपघात झाला असुन त्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून त्या जखमी इसमाला महापालिकेच्या वतीने एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी येथील समाजसेवक वामदेव भोयर यांनी काल महापालिका आयुक्त मनीषा



आव्हाळे यांच्याकडे केली आहे त्रिवेणीनगर कुर्ला कॅम्प रोड ब्लॉक नंबर ए -247जवळ दहाचाळच्या मागे उल्हासनगर नंबर 4 येथे राहाणारे अंकुश उमाजी थोरात (57) हे चार दिवसा पूर्वी दुपारच्या सुमारास विभागातील रोडवरुन रस्त्याने पायी जात असताना दहाचाळ जवंळील गल्लीलगत मुख्य रोडलगत मधोमध उघडा चेंबर आहे त्या चेंबरचे घाण मलयुकत पाणी रोडवरुन वाहत आहे त्यामुळे अंकुश उमाजी थोरात वय 57/यांचा पाय घसरला आणि ते जोरात खाली कोसळुन त्यांचा डावा हात फॅक्चर झाला आहे फ्रॅक्चर झाला आहे अंकुश थोरात हे गरीब कुटुंबातून असुन ते शिलाई मशीन चालवून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करतात मात्र त्यांचा हात फॅक्चर झाल्याने त्यांचे शिलाई मशीनचे कामं बंद आहे कामं बंद असल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे या अपघातास महापालिकाच जबाबदार असुन संबंधित अधिकारी यांच्यावर यांच्यावर त्वरीत गुन्हा दाखल करून थोरात यांना एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी समाजसेवक वामदेव भोयर यांनी केली आहे

## धक्कादायक! पुण्यात मामाच्या मुलासमोर तरुणीवर सामूहिक बलात्कार, जिल्हा पुन्हा हादरला

Pune Rape Case: पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात तरुणीसोबत घडलेल्या घटनेमुळे राज्यात निर्माण झालेला आक्रोश कायम असतानाच जिल्ह्यात आणखी एक संतापजनक घटना घडली आहे. शिरूर तालुक्यातील कारेगाव इथं एका युवतीवर दोन नराधमांनी बलात्कार केला. अमोल नारायण पोटे (वय २५ वर्षे रा. कारेगाव ता. शिरूर जि.पुणे. मूळ रा. ढोकराई फाटा ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर आणि २) किशोर रामभाऊ काळे (वय २९ वर्षे, रा. कारेगाव ता. शिरूर जि. पुणे, मूळ रा. किल्ले धारूर ता. धारूर जि. बीड) अशी आरोपींची नावे आहेत.या घटनेबाबतची अधिक माहिती



अशी की, कारेगाव इथं पीडित तरुणी व तिचा मामे भाऊ असे दोघे घरापासून काही अंतरावर गप्पा मारत असताना आरोपी अमोल पोटे आणि किशोर रामभाऊ काळे हे मोटार सायकलवरून आले आणि चाकूचा धाक दाखवून जबरदस्तीने तरुणीच्या मामेभावाला तिच्यासोबत शरीरसंबध करण्यास भाग पाडून त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडिओ आणि फोटो काढले. तसंच नंतर पीडितेसह तिच्या मामेभावाला जीवे मारण्याची धमकी देऊन नराधमांनी आळीपाळीने जबरदस्तीने शरीरसंबंध केले. तसंच पीडित तरुणीच्या गळ्यातील सोन्याचा बदाम व नाकातील सोन्याची रिंग जबरदस्तीने काढून घेतले आहेत. दरम्यान, या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसंच न्यायालयाने पोलिस कस्टडी रिमांड मंजूर केले आहे.

## सेंट झेवियर्स हायस्कूल,बोरिवली(पूर्व)येथे मराठी दिन सोहळा उत्साहात साजरा

**-मुंबई प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

भाषा नेहमीच विशिष्ट प्रदेशाची संस्कृती आणि वारसा समृद्ध करते तसेच हे वारसा दाखवते आणि प्रदेशाचे गौरव करते.आपली मायबोली मराठी ही अधिकृत राज्यभाषा तसेच महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा आहे.सुंदर मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी१मार्च२०२५रोजी सेंट झेवियर्स हायस्कूल बोरीवली पूर्व येथे मराठी दिन साजरा करण्यात आला.मराठी भाषा दिन साजरा करणे हे मराठी भाषेचे सार दर्शविते आणि मराठी भाषिक समुदाय,साहित्य,कला,संगीत आणि समाजातील योगदान ओळखण्याची संधी देते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी आणि लेखक,विष्णू वामन शिरवाडकर ज्यांना'कुसुमाग्रज'म्हणून ओळखले जाते,यांच्या जीवन आणि कार्याला आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.प्रवेशद्वारावर लेझीम सादरीकरणाद्वारे पाहुण्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.श्री. चंदन सुभाष विचारे-कवी,लेखक,सामाजिक कार्यकर्ते,सांस्कृतिक प्रवासी आणि वारसाप्रेमी यंदाच्या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे होते.कार्यक्रमाची सुरूवात प्रभुची प्रार्थना,बायबल वाचन,विशेष प्रार्थना,स्वागत भाषण,स्वागत गीत आणि मराठी भाषेचे महत्त्व या विषयावरील भाषणाने झाली. प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या कोळी नृत्य




आणि लावणी सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाची धुरा वाहिली. मराठी दिनानिमित्त आठवडाभरात घेण्यात आलेल्या उपक्रम आणि स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सांगता आभारप्रदर्शन व सुमधुर समारोप समारंभाने झाली.पाहुण्यांनी महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरेचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम मांडल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.आदरणीय अध्यक्ष डॉ.ए.एफ. पिंटो सर आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. ग्रेस पिंटो मॅडम यांनी मूल्ये रुजविण्याचा आणि विद्यार्थ्यांमध्ये त्यांची प्रादेशिक संस्कृती,भाषा आणि वारसा परंपरागत रुजवून ठेवण्यासाठी आणि मराठी भाषा आणि महाराष्ट्राचा वारसा मोठ्या प्रमाणावर जोपासना व गौरव करण्याच्या प्रयत्नांचे अतिथींनी कौतुक केले.

## रेवदंडा येथे डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

महाराष्ट्र भूषण डॉ. तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त रेवदंडा गाव,भारत देशभर व महाराष्ट्र राज्यात स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या पार पडले आहे. या स्वच्छता अभियानात असंख्य नागरीकांनी सहभाग नोंदवला होता.रेवदंडा गाव व आजूबाजूचा परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीसदस्यांनी गावात जाणारे रस्ते, प्राथमिक शाळा, धार्मिक स्थळे, स्मशानभूमी, बाजारपेठा, रस्ते , रेवदंडा हायस्कूल एसटी बस स्टॉप आणि समुद्रकिनारे चकाचक केले. श्रीमत दासबोध या ग्रंथाच्या निरुपणातुन समाज घडवणारे महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचा जन्म 1 मार्च 1922 रोजी झाला.त्यांनी लाखो लोकांना व्यसनमुक्त केले, त्यांचे संसार सावरले, समाजाला अंधश्रध्देच्या विळख्यातून बाहेर काढण्याचे काम केले. यासोबतच समाजमन घडवण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे. महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेबांचे हे कार्य आता त्यांचे चिरंजीव पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि आप्पासाहेबांचे चिरंजीव रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी करत आहेत. त्याचेच एक उदाहरण म्हणजे आजचे स्वच्छता अभियान आहे.महाराष्ट्र भूषण डॉ. तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनातून रेवदंडा सह,मुंबई,संपूर्ण राज्यात तसेच भारत देश भर रविवारी स्वच्छता अभियान राबवण्यात आले होते. हे स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या पार पडले.



# महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तर्फे महास्वच्छता अभियान संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण शहरातून २५ टन सुका कचरा १५ टन ओला कचरा संकलीत. थोर समाज सुधारक महाराष्ट्र भूषण डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजातील अज्ञान ,अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी परंपरा, जातीव्यवस्था, स्त्रियांवरील अत्याचारांसारख्या प्रथांविरुद्ध समाज प्रबोधन केले. तसेच समर्थ रामदासांच्या दासबोधाचे ते निरूपणकार होते. त्यांनी आयुष्यभर अध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाज प्रबोधन व व्यसनमुक्ती क्षेत्रात निर्लसपणे कार्य केले .डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांचे जगभरात लाखो अनुयायी आहेत.१ मार्च हा त्यांचा जन्मदिवस त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करून, सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. आणि आज त्यांच्याच कार्याचा वसा त्यांचे पुत्र पद्मश्री डॉ आप्पासाहेब धर्माधिकारी व त्यांचा संपूर्ण परिवार त्यांच्या कार्याची धुरा सांभाळत आहेत. तेही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजप्रबोधनाचे कार्य पुढे नेत आहेत. १ मार्च २०२५ रोजी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिनानिमित्त "शहर स्वच्छता अभियानाचे "आयोजन करण्यात आले होते. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून वेळोवेळी रक्तदान शिबिर, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण व संवर्धन, विहिरी नद्या साफसफाई , जलपुनर्भरण पाणपोई बंधारा , शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छता अभियान असे अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात.याच अनुषंगाने रविवार दिनांक २ मार्च २०२५रोजी सकाळी साडेआठ वाजता" नागरी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ही स्वच्छता मोहीम स्वच्छ भारत अभियानाचे महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपालांनी नियुक्त केलेले स्वच्छता दूत पद्मश्री डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ.श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. शहरासोबतच महाराष्ट्रातील तसेच देशात व परदेशात देखील विविध शहरांमध्ये हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्री बैठकांमधील हजारोंच्या संख्येने सर्व श्री सदस्य यात सहभागी झाले होते. या स्वच्छता अभियानामध्ये शहरातील सर्व प्रमुख रस्ते व शासकीय कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात आले. तसेच या अभियानामध्ये सर्व शासकीय कर्मचारी यांनी देखील सहभागी व्हावे असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. उरणमधील स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून शासकीय कार्यालय व मुख्य रस्ते स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत श्री बैठकीतील १७१४ सदस्यांनी सहभाग घेतला होता. १५ टन ओला कचरा तर २५ टन सुका कचरा संकलित करण्यात आला.




## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार नांदेड येथील पक्षप्रवेश सोहळा व मेळाव्यानिमित्त उपस्थिती



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री आदरणीय नामदार अजितदादा पवार साहेब हे नांदेड येथील पक्षप्रवेश सोहळा व मेळाव्यानिमित्त नांदेड येथे आले असता त्यांचा सामाजिक न्याय विभागाच्या वतीने श्रीनगर येथे ढोल ताशाच्या गजरात, फटाक्याच्या आतिषबाजीने पंचरंगी गमच्या व चमकदार निळी शॉल तसेच भारताचे संविधान देऊन असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी नांदेडचे लोकप्रिय नेते आमचे मार्गदर्शक आदरणीय आमदार प्रतापरावजी पाटील चिखलीकर साहेब मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे आमदार मा.विक्रमजी काळे साहेब जिल्हाध्यक्ष मा.दिलीपराव धर्माधिकारी साहेब, प्रदेश संघटक सचिव मा.डॉ.उत्तमराव सोनकांबळे साहेब तसेच नांदेड विधानसभा माजी आमदार मा.मोहनअण्णा हंबर्डे साहेब यांच्यासह विविध प्रमुख मान्यवरांची पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती



दखल

## मोबाईलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

मोटरसायकलवर आलेल्या इसमाने मोबाईल फोन चोरल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

योगेश आहेर हे कामोठे, सेक्टर 9 येथे राहत असून 24 फेब्रुवारी रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास मेडिकल मधून औषध आणण्यासाठी निघाले. ते कॉन्फरन्स कॉल वर बोलत असताना पावणे बाराच्या सुमारास मोटरसायकलवर आलेल्या इसमाने हातातील मोबाईल फोन चोरला आणि तो पळून निघून गेला.

===================

## वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: रस्ता क्रॉस करत असताना वाहनाने दिलेल्या धडकेत हननान अली याचा मृत्यू झाला. या प्रकरणी वाहनचालक साईनाथ बेर्डे यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 24 फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेचार च्या सुमारास हननान अली हा चहा आणि पाणी घेऊन येण्यासाठी दुकानातून पळस्पे येथील गोवा हायवेवर असलेल्या जयवंत हॉटेल शेजारील टपरी मध्ये जाण्यासाठी रस्ता क्रॉस करत होता. वाहन क्रमांक एम एच 15 सीआर 64 48 वरील चालक साईनाथ बेर्डे यांनी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवले आणि हननान अली याला ठोकर मारून अपघात केला. त्यात त्याचा मृत्यू झाला.

==========

## गुंतवणुकीवर तीन पट रकमेचा परतावा देण्याचे आमिष दाखवून एक कोटी एक लाखांची फसवणूक

दैनिक युवक आधार

नवीन पनवेल वार्ताहर : साखळी पद्धत मार्केटिंग कंपनी स्थापन करून गुंतवणुकीवर तीन पट रकमेचा परतावा देण्याचे आमिष दाखवले आणि परतावा न देता एक कोटी एक लाख 47 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सुनील विश्वकर्मा, संतोष शिर्के, नाना राणे व केशव पावसकर यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नीलम मुस्के या पनवेल, करंजाडे येथे राहत असून यांच्या ओळखीचे केशव पावस्कर यांनी साखळी पद्धत मार्केटिंग मध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यांनी स्काय मंत्रा व स्काय एंजल नावाच्या मार्केटिंग कंपनीत पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले. यावेळी वर्षभरात गुंतवणूक केलेल्या रकमेवर तीन पट परतावा मिळेल असे सांगितले. त्यानंतर त्यांनी कंपनीचे मालक सुनील विश्वकर्मा व संतोष शिर्के यांच्या बद्दल माहिती दिली आणि संतोष शिर्के यांच्यासोबत करंजाडे येथे भेट करून दिली आणि विश्वकर्मा यांच्यासोबत व्हिडिओ कॉल करून ओळख केली. प्रत्येकाने अधिक सदस्य जोडल्यास कंपनी जास्त परतावा देईल असे आश्वासन दिले व सदस्य जोडण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी त्यांच्या नातेवाईकांना कंपनी चांगली असल्याचे सांगून स्कीम बद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी पैशांची गुंतवणूक केली. त्यानंतर दागिने गहाण ठेवून कॉइन मध्ये गुंतवणूक केली. काही दिवसांनी कंपनीच्या अकाउंट मध्ये ऑडिटचा प्रॉब्लेम चालू असल्याचे पावसकर आणि शिर्के यांनी सांगितले. त्यानंतर फोन देखील घेतला नाही. काही दिवसांनी दोन्ही कंपन्या गुंतवणूकदारांना परतावा न देता बंद केल्याचे समजून आले. तब्बल 30 जणांचे एक कोटी एक लाख 47 हजार रुपये घेऊन परत न केल्याप्रकरणी चौघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

==============

## दोन बांगलादेशींनवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी 27 फेब्रुवारी रोजी दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करत त्यांना अटक केली.

करंजाडे, सेक्टर 6 या परिसरामध्ये काही बांगलादेशी नागरिक वास्तव्य करत असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी पोलीस गेले असता मोकळ्या मैदानामध्ये एका झोपडीमध्ये दोन पुरुष दिसून आले. त्यांनी त्यांची नावे मोहम्मद राकिब अब्दुल रजाक आणि तरीकुल हरीस उदिन अशी सांगितली. त्यांच्याकडे कोणतेही वैध प्रवासी कागदपत्रे सापडून आली नाहीत.

# श्री साईबाबांच्या नवघर येथील मंदिराचा २९ वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या भक्तिभावात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर**

उरण तालुक्यातील नवघर गावातील श्री साईबाबांच्या असणा-या भव्यदिव्य अशा मंदिराचा वर्धापन सोहळा शनिवार दि.०१ मार्च २०२५ रोजी मोठ्या भक्तीमय वातावरणात विविध कार्यक्रमाने संपन्न झाला असून सकाळी ५-३० वाजता कलश पूजन ६-०० वाजता श्रींची काकड आरती करून ६-३० वाजता श्रींचे मंगलस्नान व लघुरूद्र अभिषेक उद्योगपती वामनशेठ तांडेल यांच्या शुभहस्ते करण्यात येऊन दुपारी १२-०० वाजता श्रींची मध्यान्ह आरती जमलेल्या शेकडो साई भक्तांच्या उपस्थीतीत करण्यात आल्या नंतर दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद (साई भंडारा) चा तमाम साईभक्तांनी लाभ घेतला त्यानंतर संध्याकाळी ६-०० वाजता धूपा आरती करून सायंकाळी ठिक ७ - ०० वाजता कै.शंकुतला गजानन घरत यांच्या स्मरणार्थ मनिषा दिनेश भोईर यांच्या तर्फे गुरूकृपा प्रासादिक भजन मंडळ कोपर ( गव्हाण ) गायीका सुप्रिया घरत(खारकोपर) पखवाज तुषार घरत(चिर्ले) तबला वादक ॲड. मिलिंद कडू(खारघर) टाळ शितल घरत(खारकोपर) यांच्या सुमधुर भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला त्यानंतर साई भंडारा ( महाप्रसाद ) तसेच या भव्यदिव्य मंदिराची रंगरंगोटीचे काम श्री साईभक्त रमनताई वामनशेठ तांडेल नवघर यांच्या तर्फे करण्यात आले असून या भक्तीमय सोहळ्यासाठी डॉ. किरण मोकल,एकनाथ शिवराम म्हात्रे,दिनकर भगत,वासुदेव भगत,एम.के.भोईर(पाणजे) मोहन भोईर(भेंडखळ) गणपत म्हात्रे (फुंडे) अविनाश म्हात्रे, भालचंद्र तांडेल व सुरेश तांडेल (पागोटे) रमाकांत निषाद,राजेंद्र प्रसाद,दिलीप कडू,प्रकाश तांडेल व कमलाकर ठाकूर(जसखार) तसेच लाईट डेकोरेशन व स्पिकर जयवंत महादेव म्हात्रे यांनी विशेष सहकार्य केले तर सदर भक्तिमय सोहळा पार पाडण्यासाठी श्री साई मंडळाचे पदाधिकारी विजय पुरूषोत्तम तांडेल,दशरथ जनार्दन तांडेल,काशिनाथ शिवराम पाटील,भगवान शंभा भोईर,दिनेश एकनाथ भोईर,हरेश्वर भास्कर पाटील,राजाराम गिरधर तांडेल,संतोष नारायण ठाकुर,गणेश नामदेव भोईर,राजेंद्र यशवंत पाटील,जितेंद्र कान्हू म्हात्रे यांच्यासह व्यवस्थापक ग्रामस्थ मंडळ नवघर यांच्या समवेत नवघर परिसरासह उरण तालुक्यातील साई भक्तांनी सकाळपासूनच आपल्या हाकेला धावून येणा-या आपल्या साईबाबांच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या तर श्री साई नामाच्या गजरात संपूर्ण नवघर गावासहीत परिसर भक्तिमय झालेले पाहवयास मिळाले.



## तहसिलदारांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग केला सुकर

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**



माणूस मेल्यानंतरही इहलोकीचा प्रवास करतांना त्याला मार्ग मिळू नये, यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती? अशीच हृदय पिळवटून टाकणारी घटना कोळगाव ता.निफाड येथे घडली. एका वयोवृद्ध महिलेच्या अंत्यसंस्कारासाठी कुटुंबियांना संघर्ष करावा लागला. रस्त्याच्या अंतर्गत वादामुळे महिलेच्या पार्थिवाला अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी मार्गच नव्हता. मात्र, निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग सुकर केला. कोळगाव येथील माजी सरपंच ज्ञानेश्वर यशवंत घोटेकर यांच्या ८० वर्षीय मातोश्री गं.भा. चंद्रभागा यशवंत घोटेकर यांना देवाज्ञा झाली. मात्र, नातेवाईकांना त्यांच्या घरी जाण्यासाठी आणि मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी रस्ता नव्हता. हा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे वादात अडकलेला आहे. त्यामुळे रस्त्याभावी अंत्यसंस्कार कसे करायचे? या विवंचनेत घोटेकर कुटुंबीय होते. त्यांनी निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांना भ्रमणध्वनी वरून परिस्थिती कथन केली. परिस्थितीची जाणीव होताच, तहसिलदारांनी तातडीने देवगावचे मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर पगार, तलाठी विठ्ठल पोटरे, पुरुषोत्तम निकम, अमोल चव्हाण यांचे पथक घटनास्थळी पाठवले. तेथे रात्री १ वाजेपर्यंत प्रशासनाची बैठक झाली. यावेळी तहसिलदार सातत्याने पथकाच्या संपर्कात होते. भूमी अभिलेख कर्मचारी उपस्थित नसल्याने रस्त्याबाबत ठोस निर्णय घेता येत नव्हता. त्यामुळे त्यांनी ग्रामस्थ आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करत शेतातून अंत्ययात्रा जाऊन द्यावी अशी विनंती केली. त्याच्या विनंतीला मान देऊन वादी नरहरी घोटेकर यांनी शेतातुन अंत्ययात्रा जाण्यास परवानगी दिल्याने तात्पुरता मार्ग काढण्यात आला व दि.२८ फेब्रु.रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार विधी पार पडला. प्रशासनाच्या वेगवान निर्णयामुळे एका कुटुंबाची तगमग संपली. गावकऱ्यांनी तहसीलदार नाईकवाडे यांच्या संवेदनशील आणि त्वरित निर्णय क्षमतेचे कौतुक केले. तहसिलदार यांनी माणुसकीच्या नात्याने घेतलेल्या निर्णयामुळे व संवेदनशील अधिकाऱ्यांमुळेच समाज अजूनही उभा आहे हे या घटनेमुळे सिद्द झाले.

**काय आहे रस्त्याचा वाद?**

पूर्वी कोळगाव - रुई हा शिवरस्ता अस्तित्वात होता. मात्र नजीकच्या साहेबराव दगु घोटेकर व नरहरी दगु घोटेकर यांनी शासकीय मोजणी केल्यानंतर तो त्यांच्या हद्दीत आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे त्यांनी तो अधिग्रहित केला आहे. मात्र त्यामुळे सध्या शिवरस्ता वापरणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय झाली असून यावर महसूल खात्याने कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## सुरक्षा नंबर प्लेटचा `उच्च` वाद

**वाहनांसाठीच्या शुल्काबाबतचा आरोप शासनाने नाकारला**

**इतर राज्यांप्रमाणेच दर असल्याचा सरकारचा दावा**

**मुंबई** : उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट्स (HSRP) शुल्क अधिक आकारल्याबाबतच्या विरोधी पक्षाच्या आरोपाला महाराष्ट्र सरकारने नकार दिला आहे. हे दर इतर राज्यांप्रमाणेच आहेत, असा दावा राज्याने केला आहे.

शुक्रवारी उशिरा जारी केलेल्या निवेदनात सरकारने नमूद केले की, नोंदणी प्लेट्ससाठीच्या टेंडर्स देताना योग्य प्रक्रिया पाळली गेली आणि एक उच्च-शक्तीच्या समितीने या दरांना मान्यता दिली. विरोधी पक्षांनी, एनसीपी (एसपी) आणि काँग्रेस यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहून HSRP साठी कंपन्यांना देण्यात आलेल्या कंत्राटांवर तपास करण्याची मागणी केली.

सरकारच्या निवेदनानुसार, परिवहन आयुक्त कार्यालयाने समितीने मान्यता दिलेल्या दरांनुसार शुल्काची आज्ञा जारी केली आणि या शुल्कामध्ये नंबर प्लेट्स व बसवण्याचा खर्च समाविष्ट आहे.

सरकारने दावा केला की इतर राज्यांमध्ये GST वगळता HSRP दर द्विचाकी वाहनांसाठी रु. ४२०-४८०, तीनचाकी वाहनांसाठी रु. ४५०-५५० आणि चारचाकी व जड वाहनांसाठी रु. ६९०-८०० दरम्यान आहेत. महाराष्ट्रात जीएसटी वगळता शुल्क द्विचाकी वाहनांसाठी रु. ४५०, तीनचाकी वाहनांसाठी रु. ५०० आणि चारचाकी व जड वाहनांसाठी रु. ७४५ आहेत.

### काय आहे HSRP?




HSRP म्हणजे असे लायसन्स प्लेट्स जे वाहनांची ओळख करून चोरी आणि इतर फसवणूक करणाऱ्या कृतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुधारित सुरक्षा वैशिष्ट्यांसह डिझाइन केलेले आहेत. सरकारने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांसाठी HSRP अनिवार्य केले असून HSRP बसवण्याची अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवली आहे.

# विलासभाऊ पवार यांचा नि:स्वार्थ सेवेचा प्रवास

## आनंदाचे बीज पेरणे": "उत्तम उद्यासाठी विलासभाऊ पवार यांचे स्वप्न"

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

विलासभाऊ पवार हे समाजात आशेचे आणि करुणेचे दीपस्तंभ म्हणून उभे आहेत, जे खऱ्या अर्थाने इतरांना नि:स्वार्थपणे देण्यानेच समाधान मिळते या तत्त्वाचे अनुकरण करतात. त्यांच्या जीवनाचे तत्वज्ञान या कल्पनेवर केंद्रित आहे की आपण काय मिळवू शकतो यापेक्षा समाजात काय योगदान देऊ शकतो याला प्राधान्य दिले पाहिजे. ही श्रद्धा संत तुकडोजी महाराजांच्या शिकवणींशी खोलवर जुळते, ज्यांनी जीवनाच्या क्षणभंगुर स्वरूपावर आणि आनंद पसरवण्याच्या महत्त्वावर भर दिला. विलासभाऊंचे प्रभावी काम अनेकदा गुप्त राहते, कारण ते त्यांच्या दयाळू कृत्यांची जाहिरात करत नाहीत. त्यांनी संकटात सापडलेल्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी, कोणत्याही मान्यता किंवा बक्षीसाची अपेक्षा न करता सांत्वन आणि आनंद देण्यासाठी स्वतःला समर्पित केले आहे. विविध उपक्रमांमध्ये त्यांची सामाजिक जबाबदारीची वचनबद्धता स्पष्टपणे दिसून येते.: २१ मुलींचे लग्न: विलासभाऊंनी २१ गरीब मुलींना लग्नाची संधी मिळावी आणि त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी मिळावी यासाठी पुढाकार घेतला आहे. कर्करोग रुग्णांसाठी वैद्यकीय मदत: त्यांनी ३४ कर्करोग रुग्णांसाठी मोफत वैद्यकीय प्रक्रियांची सोय केली आहे, ज्यामुळे आव्हानात्मक काळात त्यांचा आर्थिक भार कमी झाला आहे. अनाथ मुलींसाठी शिक्षण: त्यांचे प्रयत्न गरीब किंवा अनाथ असलेल्या १५ मुलींना शिक्षण देण्यासाठी आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी ज्ञान आणि कौशल्ये देऊन सक्षम करण्यासाठी विस्तारित आहेत.

दैनिक अन्न वितरण: गेल्या नऊ वर्षांपासून, विलासभाऊ आणि त्यांची टीम घाटंजी व पांढरकवडा शहरातील दररोज ६० व्यक्तींना जेवण पुरवत आहेत, ज्यात मानसिकदृष्ट्या आजारी आणि निराधार लोकांचा समावेश आहे, ज्यामुळे समाजात "जिव्हाळ्याची भिंत" निर्माण झाली आहे.

या उपक्रमांद्वारे आणि इतर असंख्य दयाळू कृत्यांद्वारे, विलासभाऊ पवार आपल्या सर्वांना सेवाकार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करतात. त्यांचे जीवन एक शक्तिशाली आठवण करून देते की लहान कृती देखील इतरांच्या जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतात, आपल्यापैकी प्रत्येकाला आपल्या समुदायांमध्ये सकारात्मक योगदान देण्यास प्रोत्साहित करतात..



# रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा ; नागोठणे शहरात अत्याधुनिक रुग्णालयाची गरज – वैकुंठ पाटील

**रोटरी लॅब आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात केले प्रतिपादन**

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

सॅटॅलाइट रोटरी इंटरनॅशनल क्लब ,रोहा रोटरी क्लब व डॉ. आर.एन.पाटील यांचे सुरज हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिव गणेशोत्सव मंडळ सभागृहात रविवार 02 मार्च रोजी सरपंच सुप्रिया संजय महाडिक, सहा.पो.नि.सचिन कुलकर्णी, सुरज हॉस्पिटलचे डॉ. उदय पाटील,भाजप रा.जि.कार्यकारणी सदस्य मारुती देवरे, क्लबचे नागोठणे अध्यक्ष सचिन मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी, उपचार व मोफत औषधे वाटप शिबिरात रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असल्याचे सांगून नागोठणे शहरात अत्याधुनिक रुग्णालयाची गरज असल्याचे प्रतिपादन भाजप रा.जि. उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी केले. सचिन मोदी यांचे विशेष सहकार्य लाभलेल्या तसेच



250 रुग्णांनी लाभ घेतलेल्या या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, आज विविध प्रकारचे आजार वाढत असून त्यामधून व्यायाम पटूही सुटत नाहीत. त्यामुळे आपली दैनिक तपासणी करणे महत्वाची असून त्यासाठी आशा शिबिरांची आवश्यकता नक्कीच आहे.ते शिबीर आज सचिन मोदी क्लबच्या माध्यमातून महत्वाचे काम केले आहे.आपल्या आरोग्यासाठी शिबीर व सरकारी योजनेचा फायदा घेण्याचे आवाहन करून नागोठणे येथे भव्य रुग्णालयाची आवश्यकता तसेच येथील सरकारी रुग्णालयाची सुधारणा करणे गरजेचे असल्याचे शेवटी पाटील यांनी सांगितले. डॉ.सुनील पाटील यांनी आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे.डोके शांत ठेऊन आरोग्य सांभाळण्यचा सल्ला दिला.डॉ.उदय पाटील यांनी कोणीही वंचित न राहता आरोग्यासाठी सरकारी योजनेचा लाभ घ्या. आरोग्याबाबत आम्ही लोकांपर्यंत शिबिरा मार्फत पोहचत असतो आम्हाला सेवेची संधि द्या. डॉ.शेळके यांनी या शिबिराचा फायदा घेत आरोग्याकडे वेळीच लक्ष देण्याची सूचना केली. सचिन कुलकर्णी यांनी या धकाधकीच्या जीवनात आरोग्य सांभाळा,त्याची काळजी घेत वेळीच उपचार करावा.शरीरासाठी व्यायाम व सकस आहार हा उत्तम उपाय आहे. सचिन मोदी यांना यासारखे शिबीर भरावून समाज सेवा करण्यासाठी सुभेच्छा दिल्या. मारुती देवरे यांनी लोकांच्या रोग्यासाठी घेतलेल्या या शिबीराचा गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन केले.आपल्या प्रस्तावनेत सचिन मोदी यांनी अशा शिबिराची आपल्या विभागात गरज असल्याचे सांगून अशा प्रकारचे शिबीर सतत भरविणार असून आपली सेवा करणार असल्याचे सांगितले. यावेळी भाजपा जि.उपाध्यक्षा श्रेया कुंटे,भाजपा ता.सरचिटणीस आनंद लाड, गडब सरपंच मंगेश पाटील, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराज पानसरे, ग्रा. पं. सदस्या अमृता महाडिक, विना मोदी डॉ. सुनील पाटील, क्लबचे डॉ.रोहिदास शेळके व गौतम जैन,विवेक रावकर,सूरज रुग्णालयचे विनोद म्हात्रे,धनराज सुळे,राज शेलार,रींकल घोटवळ यांच्यासह डॉ अभिषेक शहासने,दळवी गुरुजी, प्रशांत गोळे, प्रवीण जैन तसेच रुग्ण व नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद नागोठणेकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार सचिन मोदी यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सचिन मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबचे पदाधिकारी सदस्यांनी तसेच रुग्णालयाचे डॉक्टर व कर्मचारी यांनी अपार मेहनत घेतली.

## सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत सामील व्हा. :– राहुल सोनवणे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मस्साजोग ते बीड सदभावना पदयात्राचे काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील राष्ट्रीय काँग्रेसचे खासदार सौ.रजनीताई पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून सदरील सदभावना पदयात्रा यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनीताई पाटील यांच्या सुचनेवरून बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र राज्य युवक सचिव तथा केज नगर पंचायतचे विद्यमान नगरसेवक व माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील, केज नगर पंचायत उपनगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट, प्रविणकुमार शेपू, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शिवाजीराव कोकाटे, समीर देशपांडे, तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव, अड.विशाल मस्के, यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे बोलत होते. सामाजिक समतोल राखण्यासाठी सदभावना पदयात्रेत मोठ्या संख्येने सामील व्हा असे आवाहन या बोलताना त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते शिवाजीराव कोकाटे हे होते. या वेळी सदरील बैठकीचे प्रस्ताविक राहुल जाधव यांनी केले. सदरील कार्यक्रमात काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी जिल्ह्यातील गेल्या तीन ते चार महिन्यातील गुन्हेगारीच्या पार्शश्वभूमी वर मुद्देसूद भाष्य करत, जिल्ह्यातील असणारी ओळख ही सामाजिक



समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी, पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन उपस्थितांना शासकीय विश्रामगृहात येथील बैठकीत केले. या वेळी आनंदराव कोकाटे, शहाजीराजे कोकाटे, येवलवाडी उपसरपंच तथा सेवा सहकारी सोसायटी संचालक, राहुल नागरगोजे, बालाजी पवळ, हनुमंत तांबे, चंद्रकांत साठे, सचिन सवासे, शेख मुन्नाभाई केबलवाले, अजिनाथ वीर, प्रताप जाधव, नितीन राऊत, सय्यद सरफराज (गुड्डू) सुनील नारायणकर, सचिन डिडुळ यांच्या सह अनेकजन उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय काग्रेसचे उपाध्यक्ष प्रा.सुनिल वाघमारे यांनी केले. तर राष्ट्रीय युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल काळे यांनी आभार मानले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle




## होरायझन अकॅडमीचे संगीत परीक्षेत यश

**दैनिक युवक आधार निफाड**
**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड येथील होरायझन अकॅडमी येथे 2024- 25 च्या नोव्हेंबर सत्रातील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई आयोजित गायन, वादनाच्या परीक्षेत अनुक्रमे प्रारंभिक परीक्षेत हार्मोनियम विषयात दुर्वाक श्रीकांत रायते ,परिस संजयकुमार सोनवणे, तसेच गायन परीक्षेत हर्ष भूषण चोरडिया प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच प्रवेशिका प्रथम परीक्षेत आयात फिरोज इनामदार, अवनीश राजेंद्र सोनवणे, तेजस्विनी किरण वाढवणे, न्यानदा प्रशांत पाटील,तीर्था जगदीश देशमुख, रितिका अनिल सदाफळ, गौरी श्रीराम पितळे, प्राप्ती स्वप्निल व्यवहारे, तबला परीक्षेत मोक्ष जिगर ठककर ,हार्मोनियम विषयात अद्वैत ढेमसे यांनी यश मिळविले. तसेच या वर्षात मनाचे श्लोक पाठांतर व लेखन स्पर्धेत अनुक्रमे समृद्धी राहुल रुकारि,आदर्श राहुल रुकारि,तन्वी योगेश गायकवाड, वेदांत सुनील काळे, जानवी संदीप गाजरे,सिद्धी माणिक कोकाटे यांनी यश संपादन केले. त्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे, संस्थेचे उपसभापती बि.मोगल, शालेय शिक्षण समिती सदस्य ॲड श्रीकांत रायते , मंजिरी कुंदे शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अभिनंदन केले .त्यांना संगीत शिक्षक अभिजीत सुरळीकर सरांचे मार्गदर्शन मिळाले.

## शिवसेना भांडुप विभाग प्रभाग क्र.११५च्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(पंकजकुमार पाटील)**

: मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने शिवसेना भांडुप विभाग प्रभाग क्र ११५च्या वतीने व संदीप भाई जळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी उद्योजक व शिवसैनिक श्री यतीन सावंत यांच्या संकल्पनेतून 'गौरव मराठी साहित्यिकांचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमा अंतर्गत, विभागातील साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी, कवी व लेखक डॉ. राम कदम, श्री .सुरेश पाटील सर, सौ. शितल ताई भुवड, श्री प्रदीप कासुर्डे सर,सौ स्वामिनी काराने ,श्री लव क्षिरसागर आणि पत्रकार श्री पंकजकुमार पाटील व मयूर राणे तसेच गडकिल्ले व संवर्धन यूट्यूब ब्लॉगर श्री प्रथमेश राणे यांचा शिवसेना पक्षाचे भांडुप विधानसभा आमदार मा. श्री अशोक पाटील साहेब यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व, मराठी संस्कृती याबद्दल आपापली मते व्यक्त करून मराठी भाषेची जपवणूक व तीला समृद्ध करण्याचे काम प्रत्येक मराठी भाषिकाचे असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमाला महिला विभाग प्रमुख सौ राजश्री मांदवीलकर, भांडुप विधानसभा महिला अध्यक्षा श्रीमती नेहा पाटकर, भांडुप विधानसभा संघटक श्री उदय पाडावे, शाखा क्र ११५ च्या महिला शाखा अध्यक्षा सौ तेजस्वी बने, शिवसैनिक श्री राजेश फडतरे तसेच विभागातील समस्त महिला व पुरुष शिवसैनिक उपस्थित होते.



## खांदा कॉलनीत हॉटेल चालकांच्या अतिक्रमणावर पनवेल महापालिका मेहेरबान

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेत सध्या अतिक्रमण विरोधी मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू आहे या अंतर्गत अनेक भागातील अतिक्रमण पनवेल महापालिकेतर्फे हटवण्यात येत आहे खांदा कॉलनीत फुटपाथवरील अतिक्रमणे पनवेल महापालकी तर्फे हटवण्यात आली या अंतर्गत फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली फुटपत वरील अनेक राजकीय पक्षाची कार्यालय देखील तोडण्यात आली परंतु खांदा कॉलनीतील हॉटेल चालकांच्या अतिक्रमणावर पनवेल महापालिकेने दुर्लक्ष केल्याचे पहावयास मिळत आहे त्यामुळे पनवेल महापालिका या हॉटेल चालकांवर नक्की का मेरबान होत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे खांदा कॉलनीत विविध सेक्टरमध्ये हॉटेल चालकांनी मोठ्या प्रमाणात फुटपाथ काबीज करून यावर अतिक्रमण केले आहे येते टेबल टाकून संध्याकाळी व्यवसाय केला जातो गोरगरीब सामान्य नागरिकांवर पनवेल माहापालिका कारवाई करत असताना या धनदांडग्या हॉटेल चालकांवर पनवेल महापालिका का कारवाई करत नाही हा प्रश्न खांदा कॉलनीतील नागरिकांना पडला आहे भरमसाठ टॅक्स घेणारी पनवेल महानगरपालिका अतिक्रमविरोधी मोहीम राबवताना मात्र भेदभाव करताना दिसत आहे अनेक राजकीय हस्तक्षेप असलेल्या लोकांना पनवेल महानगरपालिका सपोर्ट करताना दिसते त्यामुळे पनवेल मापलेच्या अतिक्रम विरोधी मोहिमेविरुद्ध शंका निर्माण होत आहे ही मोहीम राबवताना अतिक्रमणावर सरसकट कारवाई व्हावी अशी सामान्य नागरिकांची जनभावना आहे

# मोटर सायकल चोरीचा लावला छडा :निफाड पोलीसांची कामगीरी

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड पोलिसांनी चोरीस गेलेल्या मोटर सायकल लावला छडा.दि. 20/02/2025 रोजी 08/30 ते सायंकाळी 09/00 वाजेच्या दरम्यान पिंपळस रामाचे, ता. निफाड, जि. नाशिक येथे फिर्यादीच्या मालकीची 1) 30,000/- रुपये किंमतीची काळ्या रंगाची बजाज कंपनीची प्लॅटीना मोटर सायकल नंबर MH-15, GY-3432 हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने स्वःताचे आर्थिक फायद्यासाठी चोरुन नेली बाबत निफाड पोलीस ठाणेस I गु.र.नं. 68/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नाशिक ग्रामिण पोलीस जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने सो, अपर पोलीस अधिक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ निलेश पालवे, निफाड उपविभाग, निफाड यांनी सदर घटनेतील अज्ञात आरोपीताचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी निफाड पोलीस ठाण्यास सुचना दिल्या होत्या. त्यानुसार निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक गणेश गुरव , तपासी, अंमलदार पो. हया 1230 एन.एन. साळवे, तपास पथकातील पोलीस अंमलादार यांनी गुन्ह्यातील फिर्यादी यांचेकडे सखोलपणे चौकशी केली व घटनास्थळाचे सिसिटिव्ही चेक केले असता आरोपी हा विधिसंघर्षीत बालक असल्याचा संशय आल्याने त्यानुसार तपास सुरु असतांना संशयीत विधीसंघर्षीत बालकाकडे सखोल पणे चौकशी करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे. चौकशी दरम्यान संशयीत विधिसंघर्षित बालकाकडुन खालील प्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यात निफाड पोलीस स्टेशन कडिल दोन मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहे. तसेच ओझर येथील एक मोटर सायकल व इतर मुद्देमाल मिळुन आलेला आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे. 1) 30,000/- रुपये किंमतीची काळ्या रंगाची बजाज कंपनीची प्लॅटीना मोटर सायकल नंबर MH-15, GY-3432 तिचा चेसिस क्रमांक MD2A76AY6KWC17606 व इंजीन नंबर PFYWKC88693 असा असलेली. 2) 10,000/- रुपये किंमतीची एक मोटर सायकल बजाज कंपनीची काळ्या रंगाची 100 मॉडेलची गाडी, तिचा इंजीन नंबर

DZZWDD13803 तिचा चेसी नंबर MD2A18AZ5DWD13784 असा तिचा नंबर MH-15, DY-9355 असा असलेली. 3) हिरो कंपनीची काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटर सायकल तिचा क्रमांक MH-15, HA-1695 असा असलेली.

4) SAMSUNG कंपनीचा सफेद रंगाचा स्क्रिनटच मोबाईल जु. वा

) VIVO कंपनीचा काळ्या रंगाचा स्क्रिनटच मोबाईल, जु.वा.

6) 5,10 रुपयांचे कॉइन असलेले एकूण 250/- रुपयांची चल्लर




नाशिक ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधिक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ निलेश पालवे, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक गणेश गुरव, तपासी अंमलदार पो. हवा 1230 साळवे, पो.हवा 1363 खरात, पो.हवा 2495 ढिकले, पो.ना. 2661 सांगळे, पो.शि 2843 जाधव, पो.शि. 2941 दरोडे, पो.शि. 3090 जाधव, पो.शि. 145 जाधव, म.पो.ना. 2715 गायकवाड, म.पो.ना. 2424 शिंदे यांच्या पथकाने वरिल गुन्ह्यातील विधिसंघर्षित बालकाकडुन गुन्ह्यातील गेला मुद्देमाल व इतर मुद्देमाल हा 24 तासाच्या आत हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

# आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आमदार राजू तोडसम यांनी पाठिंबा दिला"

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

उपशीर्षकः "१ लाख रु. ची आशेची भावना" तहसील कार्यालयात शोकाकुल कुटुंबांना १ लाख रुपयांची मदत वाटप करण्यात आली आहे. तहसील कार्यालय, महाराष्ट्र – शेती संकटामुळे बाधित कुटुंबांना मदत करण्यासाठी एक प्रामाणिक उपक्रम म्हणून, मा. श्री. आमदार प्रा. राजूभाऊ तोडसम यांनी आज १ लाख रु. चे धनादेश वाटप केले. आर्थिक अडचणींमुळे आत्महत्या केलेल्या पाच शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ लाख



रुपये. तहसील कार्यालयात हा वितरण समारंभ पार पडला, जिथे आमदार राजू तोडसम यांनी मेळाव्याला संबोधित केले आणि या प्रदेशातील शेतकऱ्यांसमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी सामूहिक कृतीची गरज यावर भर दिला. "आपण आपल्या प्रियजनांना परत आणू शकत नाही, परंतु या कठीण काळात आपण त्यांच्या कुटुंबांसोबत उभे राहू शकतो," असे त्यांनी शेतकऱ्यांची दुर्दशा कमी करण्यासाठी समुदायाच्या पाठिंब्याचे आणि सरकारी हस्तक्षेपाचे महत्त्व दिले आहे.. या उपक्रमाचा उद्देश केवळ तात्काळ आर्थिक मदत देणेच नाही तर महाराष्ट्रातील अनेक कृषी क्षेत्रांमध्ये शेतकरी आत्महत्या ही एक गंभीर समस्या बनली आहे, त्याबद्दल जागरूकता निर्माण करणे देखील आहे. मदत घेणाऱ्या कुटुंबांनी या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि त्यांच्या दुःखाच्या काळात त्यामुळे मिळणारा भावनिक आणि आर्थिक दिलासा अधोरेखित केला. महाराष्ट्र कृषी संकटाच्या आव्हानांशी झुंजत असताना, हे पाऊल शेतकरी आत्महत्यांच्या मूळ कारणांना, ज्यामध्ये कर्ज, पीक अपयश आणि संसाधनांचा अभाव यांचा समावेश आहे, संबोधित करण्यासाठी शाश्वत उपायांची तातडीची गरज असल्याचे स्मरण करून देते. निष्कर्षः मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीचे वाटप हे कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या संघर्षांना ओळखण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. शेतकरी अशा विनाशकारी नुकसानाच्या भीतीशिवाय जगू शकतील आणि भरभराटीला येतील असे वातावरण निर्माण करण्यासाठी समुदाय नेते आणि सरकारी अधिकाऱ्यांना एकत्र काम करण्याचे आवाहन केले जाते.

# महाराष्ट्र भूषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या श्री सदस्यांचे पेण शहरात

## "स्वच्छता"मोहीम एकवीस टन कचरा केला गोळा

**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर**
**किरण बांधणकर**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या १ मार्च या जयंती निमित्त पेण येथील डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या श्री सदस्यांनी रविवारी (ता .२) पेण शहरात स्वछता अभियान राबविण्यात आले.या स्वछता अभियान मधून पेण शहरातून २१.९९ टन कचरा गोळा केला. यावेळी पेण तालुक्यातील सोळा बैठकांतील एक हजार ८१ श्री सदस्य उपस्थित होते. पेण शहरातील २१ किलोमीटर लांबीचे रस्ते स्वच्छ करण्यात आले.




महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान ,रेवदंडा यांच्या वतीने डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त पेण शहरात स्वच्छता अभियानाचे आयोजन रविवारी (ता.२) करण्यात आले होते.या मध्ये पेण तहसील,वनविभाग , पोलीस स्टेशन,तालुका दिवाणी न्यायालय , उपविभागीय अधिकारी , उपजिल्हा रुग्णालय , नगरपालिका कार्यालय , सार्वजनिक बांधकाम कार्यालय , पेण रेल्वे स्टेशन परिसर , पेण स्मशान भूमी, रामवाडी बस स्थानक , रामवाडी एस. टी. विभागीय कार्यालय, आरटीओ कार्यालय आदी बरोबरच कुंभार आळी , म्हाडा कॉलनी ,नंदीमाळ नाका , शिवाजी चौक , हनुमान मंदिर ते चावडी नाका,न्यायालय ते बस स्टँड , नगरपालिका ते चिंचपाडा रोड , प्रायव्हेट हायस्कूल ते शिवाजी चौक रोड , उत्कर्ष नगर , चावडी नाका , साई मंदिर , रेल्वे स्टेशन ते ए. टी. पाटील चौक ,अंतोरे रोड , वैकुंठ धाम स्मशान भूमी ते आंबेडकर शाळा रस्ता , रामवाडी ते महामार्ग पोलीस चौकी ,पेण एस.टी. स्टँड ते चावडीनाका आदि सर्व शहरात तसेच शासकीय कार्यालय परिसरातहे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या स्वछते मोहिमेतून १५.२७ टन सुका कचरा व ६.७१ टन ओला कचरा असा २१. ९९ टन कचरा गोळा करुन पेण नगरपालिकेच्या कचरा डेपो येथे नेण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण नगरपालिका मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य अधिकारी दयानंद गावंड , मुख्य लेखापाल किरण शहा, पेण नगर परिषद,उप जिल्हा रुग्णालय ,पेण दिवाणी व फौजदारी न्यायालय ,पेण पोलीस स्टेशन पेण वनविभाग व इतर सरकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## दिवा दातीवली येथील आर्य गुरुकुल शाळेत भव्य विज्ञान प्रदर्शन संपन्न.

दैनिक युवक आधार
अमित जाधव - प्रतिनिधी

ठाणे, दिवा ता २ मार्च : दिवा शहरातील दातीवली भागातील आर्य गुरुकुल इंग्लिश विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयक आकर्षक प्रदर्शनातून दाखवून दिले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आदर व्यक्त करत विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रज्ञांच्या योगदानाचे प्रयोग सादर केले.

सदर प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी रासायनिक प्रयोग, 'उर्जा आणि त्याचे स्त्रोत', 'पर्यावरणीय संरक्षण', 'अंतराळ विज्ञान' आणि 'आधुनिक तंत्रज्ञान' यासारख्या विविध विषयांवर मॉडेल्स आणि प्रयोग सादर केले. 'सौर उर्जा' आणि 'पाणी पुनर्चक्रण' कार्बन पुरीफिकेशन, वॉटर डॅम यावर सादर केलेल्या मॉडेल्सने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. सदर प्रदर्शनात जुनिअर केजी पासून इयत्ता ९ वी पर्यंत च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी शाळेतील प्रकल्पांचा उपयोग करून वैज्ञानिक बाबींचे उत्कृष्ट प्रदर्शन केले जे सर्वांसाठी शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त ठरले. या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रसंगी सोपान म्हात्रे आणि उमेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी शाळेचे संचालक ॲड. तुषार म्हात्रे व ट्रस्टी रविता म्हात्रे यांनी उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले तसेच विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांना वैज्ञानिक क्षेत्रात पुढे जाण्याचे प्रोत्साहन दिले. सदर आयोजन शाळेच्या मुख्यध्यापिका प्रियंका ठीकेकर व सह शिक्षक वर्ग यांनी केले असून कार्यक्रमचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सौ. प्रज्ञा पुरकर यांनी केले.




## ताबा सुटल्याने सिमेंट बल्कर झाला पलटी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, दि.2 (वार्ताहर) :** टी पॉईंट कडून कळंबोलीच्या दिशेने जाणाऱ्या सिमेंट बल्करचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र यात चालक जखमी झाला. पनवेल परिसरात अनेक विकास कामे तसेच इमारतींची कामे सुरू आहेत. त्यामुळे अपघातांची संख्या देखील वाढली आहे. टी पॉईंट कडून एम एच 43 बी एक्स 6316 या क्रमांकाचा सिमेंट बल्कर कळंबोलीच्या दिशेने जात होता. यावेळी उड्डाण पुलावरून जात असताना चालकाचा बल्करवरील ताबा सुटला आणि तो रस्त्याच्या पलीकडे पलटी झाला. यावेळी यात असलेला सिमेंटचा माल त्याच ठिकाणी पलटी झाला. या अपघातात बल्कर वरील चालक थोड्याफार प्रमाणात जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस त्या ठिकाणी दाखल झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. या सिमेंट बल्करला बाहेर काढण्याचे काम सुरू होते.



# तरुणांनी व्यसनापासून दूर राहावं तरुणांचे निरोगी आयुष्य हे देशाची प्रगती : प्रदिप पट्टेबहादुर

## "सरनाईक महाविद्यालयाच्या (NSS)शिबिरात केले प्रतिपादन"

**दैनिक युवक आधार**
**वाशिम वार्ताहर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत श्री.रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर दत्त ग्राम झाकलवाडी येथे दिनांक 28 फेब्रुवारी 2025 रोजी आजचा तरुण आणि व्यसनाधीनता या विषयावर मार्गदर्शक म्हणून लाभलेले जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त मा.रासेयो स्वयंसेवक प्रदिप पट्टेबहादूर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.मनीषा कीर्तने मॅडम,प्रा. विजय वानखेडे, सविधान प्रचार आशिष धोंगडे, आधार संस्थेचे नूर सय्यदयांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनातून म्हणाले की. तरुणांमध्ये असलेल्या उत्साह, आशा आणि ऊर्जा यांचा वापर केवळ त्यांचं व्यक्तिमत्व आणि भविष्य घडवण्यासाठी व्हावा,




म्हणून त्यांना व्यसनापासून दूर राहणं अत्यंत आवश्यक आहे. व्यसनांमुळे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो, जो देशाच्या प्रगतीसाठी हानिकारक ठरतो. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवन जगाव तरुण पिढी आपल्या देशाचा कणा आहे. तरुण पिढीच्या खांद्यावर या देशाची धुरा आहे जी नेहमीच बदल, प्रगती आणि कल्पकता याची कास धरून पुढे जाते. तरुणांचे योगदान देशाला स्वातंत्र्य मिळवून देताना फार मोठे आहे. सुखदेव, राजगुरू, मदनलाल धिंग्रा, भगतसिंग, चाफेकर बंधू, चंद्रशेखर आझाद ही तरुण क्रांतिकारकांची प्रातिनिधिक स्वरूपातील नावे आठवली तरी स्फुल्लिंग पेटतं. म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत विविध क्षेत्रात तरुणांचे योगदान लक्षणीय आहे यात शंका नाही. पण सध्याची परिस्थिती बघता, तरुण पिढीतील काही वर्गाची ऊर्जा चुकीच्या दिशेला किंवा मार्गाला जाऊन भरकटलेली दिसते आणि इथेच समाजातील सुज्ञ व्यक्तींवर दिशादर्शनाची मोठी जबाबदारी आहे. अनेक तरुण हे व्यसनांमध्ये दारू, तंबाखू, सिगारेट, गांजा, अफू, अन्य अवैध पदार्थांचा समावेश असलेल्या पदार्थांचे सेवन करतात ज्यामुळे शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो. व्यसनामुळे मानसिक ताण वाढतो, चिंता, डिप्रेशन, आणि आत्महत्येच्या विचारांना चालना मिळते. निरोगी मानसिक स्वास्थ्य तरुणांसाठी महत्त्वाचे आहे, युवापिढी म्हणजे नव्या विचारांची आणि आधुनिकतेची सांगड घालून पुढे जाणारी.आजचा तरुणच उद्याची दशा आणि दिशा ठरवणार आहे. पण आजच्या तरुणाईला गरज आहे ती आदर्श विचारांची आणि कार्यकुशल नेतृत्वाची, दिशाहीन झालेल्या तरुणांना मार्ग दाखवण्याची गरज आहे. आणि संस्कार रुजवण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केले जाते. असे मार्गदर्शन वेगळी राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण संस्था प्रतिनिधी प्रदिप पट्टेबहादुर यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला संविधान प्रचारक अनुभव शिक्षक केंद्र अमरावती वाशिम जिल्हा समन्वय आशिष धोंगडे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मनीषा कीर्तने,सहकार्यक्रम अधिकारी प्रा.विजय वानखेडे व राष्ट्रीय योजना स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजता ढोले या स्वयंसेविकांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो पि.ओ प्रा.डॉ. मनीषा कीर्तने मॅडम यांनी केले.उपस्थित सर्वांचे आभार शुभम कोकाटे यांनी मानले.

## महिंद्राच्या नविन मॉडेल ईव्ही 9 ई आणि बिव्ही 6 चे भावना ग्रुप नेरूळ येथे दिमाखदार उदघाटन



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवी मुंबई, नेरूळ येथे भावना ग्रुप महिंद्रा ईव्ही 9 ई, बिव्ही 6 याचे दिमाखदार असे उदघाटन भावना ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर राजेश शहा, भावना सेल्स ग्रुप हेड हर्षित शहा, भावना ग्रुपच्या होंडा हेड अंकीता मॅडम, जेनील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना राजेश शहा यांनी सांगितले कि, या कारचे वैशिष्ट्य पाहता लोकांची उत्सुकता पाहता नवी मुंबई परिसरातील ग्राहकांनी याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी पुढे बोलताना राजेश शहा यांनी सांगितले की महिंद्रा हि नेहमीच नवनवीन प्रणाली बाजारात घेऊन येत आहे. त्यामुळे ग्राहकांची पहिल्या पसंतीच्या गाडीसाठी महिंद्रा गाड्यांकडे पाहिले जाते. ग्राहकांना नवनवीन सुविधा देण्याकडे आमचा कल असतो त्यामुळे ग्राहकांची महिंद्रा गाडी खरेदीकडे ओढ़ असल्याचे त्यांनी सांगितले तर भावना ग्रुपच्या होंडा हेड अंकीता यांनी सुद्धा या कारबद्दल माहिती देताना सांगितले की, वाहन खरेदी करण्याकरिता ग्राहक सध्या चोखंदळ झाला आहे आणि नवनवीन यंत्रप्रणाली, सुविधा उपलब्ध कारमध्ये करून देत आहे. यावेळी मनीषा मॅडम (महिंद्रा एच आर हेड ), मानेक शर्मा (रीजनल बिझनेस मॅनेजमेंट हेड महिंद्रा ) उपस्थित होते.

# ऑनलाईन चक्री जुगार अड्डे तात्काळ बंद करा

## सुरक्षा कामगार संघटनेचा ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**
पैठण, बिडकीन पोलीस ठाणे येथे सुरक्षा असंघटित कामगार संघटनेच्या वतीने दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी बिडकीन पोलीस ठाणेचे सपोनि निलेश शेळके यांना पोलीस स्टेशन हद्दीतील ऑनलाइन चक्री जुगार अड्डे तात्काळ बंद करण्याबाबत निवेदन देण्यात आले आहे. चक्री जुगार अड्डे बेकायदेशीर रीत्या पुन्हा चालू झाले असून हे जुगार अड्डे सर्व सामान्य जनतेला व कामगार वर्गाला बरबाद करणारे आहे. रोजगाराच्या शोधात महाराष्ट्रा सह परराज्यातून आलेल्या कामगारांची व स्थानिक कामगारांची संख्या पैठण तालुक्यातील बिडकीन,चितेगाव परीसरात मोठ्या प्रमाणात आहे. हे कामगार आपला व आपल्या परीवाराचा उदार निर्वाह करण्यासाठी मोल मंजुरी कष्ट करून खातात वाढत्या महागाईमुळे परीवार सांभाळणे आजच्या घडीला कठीण झाले आहे. परंतु अनेक कामगार व छोटे मोठे उद्योग धंदे करणारे चक्री जुगार खेळाच्या आहारी जाऊन झटपट अधिक जास्त पैसा कमावण्याच्या लालसेपोटी कष्टाचा पैसा चक्री जुगार अड्ड्यावर जाऊन खेळतात हजारो रुपये काही मिनिटांत घालून मोकळे होतात शेतकरी व कष्टकरी कामगार वर्ग महिनाभर किंवा अठोडाभर काम करून मिळालेला पैसा घरापर्यंत घेऊन जाण्याएवजी या चक्री जुगार वाल्याच्या स्वाधीन करून रिकाम्या हाताने घरी जातात त्या मुळे अनेक परिवारावर उपासमारीची वेळ येत आहे .चक्री जुगारामध्ये सर्व सामान्य कामगार वर्ग होरपळला जात असून बिडकीन पोलीस ठाणेचे वरिष्ठ अधिकारी यांनी चक्री बाबत गांभिर्याने घेऊन बिडकीन पोलीस ठाणे हद्दीमध्ये चालू असलेले ऑनलाइन चक्री जुगार अड्डे तात्काळ बंद करावे अशी मागणी सुरक्षा असंघटित कामगार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. चक्री जुगार अड्डे बंद न झाल्यास बिडकीन पोलीस ठाणे समोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल अशा इशारा ही निवेदनात द्वारे देण्यात आला आहे. यावेळी कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर सोनाजी वर्फे म्हारोळा यांच्या सह पैठण ता. उपाध्यक्ष, गणेश उघडे, ता, संघटक,बाळासाहेब



बर्वे, बिडकीन सर्कल अध्यक्ष, दिलीप जोशी,निलजगाव सर्कल,अध्यक्ष, संजय पवार, लोहगाव सर्कल अध्यक्ष अशोक काळे,अध्यक्ष, अर्जुन सोनवणे, सचिन शिंदे, महेश कंठे संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# रखरखत्या उन्हात ज्वारी काढणीला आला वेग, मजुरी वाढली... गड्याला दिवसा ६०० रुपये



**दैनिक युवक आधार**
**प्रशात तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ**
तालुक्यातील येरोळ व परिसरात गव्हु व हरभरा पिकासह ज्वारी काढणीला चांगलाच वेग आला आहे. भर उन्हात ज्वारी काढणीला उत्साह यावा म्हणुन टेपवर गानी वाजवीली जात आहेत,उन्हाचा चटका वाढू लागल्याने रब्बी हंगामात पेरलेल्या ज्वारी पिकासह हरभरा, गव्हु काढणीस सुरुवात झाली आहे. पुरुषाला एका दिवसाला ६०० रुपये तर महिलांना ३०० रुपये मजुरी देण्यात येत आहे. सध्या शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळ गावासह साकोळ, शेंद, टिपराळ, राणी अंकुलगा, घुग्गी सांगवी, धामणगाव, आजणी, चामरगा, बोळेगाव, उजेड, सुमठाणा, होनमाळ , कारेवाडी, नागेवाडी आदी परिसरातील गावात परिपक्व झालेली ज्वारी काढणीस चांगलाच वेग आला आहे. सर्व शेतकऱ्याचे पिक एकदाच कापणीस आल्याने मजुर वर्गाची सुगी चालू झाल्याने प्रत्येक गावात मजुरांची मागणी वाढली आहे. त्यामुळे मजुरांना वाढीव मजुरी देऊन ज्वारीची काढणी शेतकरी करत आहेत. पुरुष मजुराला ६०० रुपये हजेरी तर महिलांना ३०० रुपये हजेरी द्यावे लागत असल्याचे प्रगतशिल युवा शेतकरी गुंडेराव चौसष्टे यांनी सांगितले. वाढलेल्या मजुरीमुळे काही ठिकाणी कुटुंबातील सदस्यच ज्वारीची काढणी करत आहेत.

**मळणीच्या कामांना आली गती....**
काढणी केलेल्या ज्वारीची टॅक्टर चलीत मशीनच्या साहाय्याने मळणीची कामे वेगात सुरू असुन गव्हाचा एक कट्टा रास करायला १७५ रुपये तर हरभरा व ज्वारी १५० रुपये प्रमाणे काढले जात असल्याचे टॅक्टर मशिन यंत्र मालक गुडुसाब कोतवाल यांनी सांगितले. शिरूरआनंतपाळ तालुक्यात ज्वारीची पेरणी १४३२ हेक्टर, गव्हु १९३, हरभरा १२७८८ तर करडईची ४८५ हेक्टरवर रब्बीची पेरणी झालेली आहे. दरवर्षीच्या तुलनेत या वर्षी ज्वारीची कमी प्रमाणात शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे. ज्वारीसह हरभरा व गव्हु लवकर काढून त्याची लवकर मळणी करून बाजारात चांगला भाव मिळेल म्हणुन त्याची विक्री करण्याच्या मार्गावर शेतकरी आहेत.

# सणसरचे कलाशिक्षक श्री परशुराम हरिदास घाडगे सर यांचे उत्तुंग यश

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
कला साधना सामाजिक संस्था, नवी मुंबई आयोजित 'राज्यस्तरीय फलकलेखन' 2025 या स्पर्धेमध्ये श्री छत्रपती हायस्कूल सणसरचे कलाशिक्षक श्री.परशुराम हरिदास घाडगे सर यांनी तृतीय क्रमांक संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक पुरस्काराचा मानाचा तुरा लावला.त्याबद्दल श्री.छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगरचे चेअरमन तसेच श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रशांत दादा काटे,श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्री अमोल पाटील,श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक अड.श्री रणजीत भैया निंबाळकर,डॉ.दिपक निंबाळकर सर्व छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य,विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.सर्जे एस.डी.सर सणसर गावचे सरपंच श्री यशवंतराव दिलीप नरुटे पाटील व सर्व सदस्य आणि विद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी आणि पालक यांच्यावतीने कलाशिक्षक श्री.परशुराम हरिदास घाडगे सर यांचे अभिनंदन करण्यात आले.या अगोदर आमच्या विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.परशुराम हरिदास घाडगे सर यांनी"गुरुद्रोणाचार्य गुणवंत शिक्षक हा 'राष्ट्रीय जीवन गौरव' पुरस्कार "मिळविला आहे.तसेच त्यांना महाराष्ट्र भूषण,महाराष्ट्र रत्न अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी विविध सामाजिक,धार्मिक, शैक्षणिक संस्थांचे व शासकीय विविध पुरस्कार मिळविलेआहेत. आतापर्यंत जवळजवळ 26 पुरस्कार श्री. परशुराम हरिदास घाडगे सर यांनी मिळवले आहेत श्री.छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयाचे नाव तालुका,जिल्हा,राज्य व देश पातळीवर पोचविले आहे.अशा गुणी कला शिक्षकास व त्यांच्या पुढील वाटचालीस सर्वाकडून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.




# एनपीसीआयच्या मुख्यालयासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड मंजूर

## डिजिटल पेमेंट क्षेत्रातील भारताचे वर्चस्व अधिक बळकट करण्याकडे एक पाऊल

**मुंबई** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एनपीसीआय) वांद्रे-कुर्ला संकुल येथे जागतिक मुख्यालय उभारण्यासाठी वाणिज्यिक भूखंड प्रदान केला आहे. या भूखंडाचे औपचारिक हस्तांतरण करण्यात आले. या वेळी कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम मंत्री मंगलप्रभात लोढा तसेच माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार उपस्थित होते.

भारतातील रिटेल पेमेंट आणि सेटलमेंट प्रणालीचे नियमन करणाऱ्या एनपीसीआयने वांद्रे-कुर्ला संकुल येथे जागतिक मुख्यालय उभारण्यासाठी वाणिज्यिक भूखंड देण्याची मागणी एमएमआरडीएकडे केली होती. या मागणीला प्रतिसाद देत, एमएमआरडीएने आपल्या १५८व्या प्राधिकरण बैठकीत, उपमुख्यमंत्री आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा भूखंड मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे एनपीसीआयचा विस्तार हा मुंबईला जागतिक फिनटेक आणि डिजिटल पेमेंट केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत राहील. एनपीसीआयला वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉकमधील सी-४४ आणि सी-४८ या संलग्न भूखंडांचे ताबा पत्र सुपूर्द करण्यात आले.

# राज्य मराठी पत्रकार परिषद खेड तालुका आयोजित पत्रकार ओळखपत्र वितरण समारंभ

## जन संवाद न्यूज पुणे (ग्रामीण) तृतीय वर्धापन दिन सोहळा राजगुरुनगर (खेड) येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओहाळ**
**खेड पुणे**
**शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५**
राज्य मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्र प्रदेश, पच्छिम महाराष्ट्र, पुणे विभाग व खेड तालुका आयोजित पत्रकार ओळखपत्र वितरण समारंभ आणि जन संवाद न्यूज पुणे (ग्रामीण) तृतीय वर्धापन दिन सोहळा शासकीय विश्राम गृह, पुणे नाशिक हायवे, राजगुरुनगर, ता. खेड जि. पुणे येथे नुकताच संपन्न झाला. सदर कार्यक्रमाची सुरुवात राज्य मराठी पत्रकार परिषद चे केंद्रीय संस्थापक, अध्यक्ष मा. मधुसूदनजी कुलथे साहेब, राज्य उपाध्यक्ष प्रवीणजी शिंदे पाटील, पुणे विभागीय अध्यक्ष नितीनजी करडे साहेब यांच्या उपस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. तदनंतर उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यानंतर राज्य मराठी पत्रकार परिषद चे केंद्रीय संस्थापक/ अध्यक्ष मा. मधुसूदनजी कुलथे साहेब, व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते खेड, जुन्नर, आंबेगाव व शिरूर तालुक्याच्या पत्रकार बांधवाना संघटनेचे चालू वर्षीचे ओळखपत्र व नवीन सभासदांचे नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. गेल्या महिन्यात आंबेगाव तालुक्यातील मान्यवरांनी कार्यक्रम घेऊन संघटनेचे नवीन वर्षाचे कॅलेंडर वितरण करण्यात आले होते. याप्रसंगी खेड तालुका विस्तार अधिकारी भोकटे साहेब, खेड तालुका अध्यक्ष डॉ देवेंद्र ओव्हाळ, युवा व्याख्याता प्रा.अक्षय साळवे, भारतीय बौद्ध महासभा खेड तालुका अध्यक्ष पी के पवार सर, शरद टेमगिरे साहेब (शिरूर), वंचित बहुजन आघाडी खेड तालुका अध्यक्ष महेंद्र नाईकनवरे, जन संवाद न्यूज पुणे ग्रामीण चे प्रथम निवेदक ह भ प नीळकंठ महाराज गायकवाड आदी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करून राज्य मराठी पत्रकार परिषद व जन संवाद न्यूज पुणे (ग्रामीण) च्या टीम ला मनापासून शाब्दिक शुभेच्छा दिल्या. तदनंतर अध्यक्षीय भाषणात राज्य मराठी पत्रकार परिषद चे केंद्रीय संस्थापक/ अध्यक्ष मा. मधुसूदनजी कुलथे साहेब यांनी उपस्थित पत्रकार बांधवाना संबोधित करून संघटना कशी वाढेल यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये दौरे करून संघटन बांधणी केली पाहिजे असे सांगितले. भविष्यकाळात आपल्या पत्रकार बांधवांसाठी बँक तयार करण्याचे प्रयत्न चालू असून पत्रकार बांधवांसाठी कार्यशाळा घेण्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रबोधनकार सुधाकरजी अभंग यांनी केले. सदर कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते निरंजन गोतारने, खेड तालुका जेष्ठ पत्रकार अमितजी टाकळकर सर, पंचायत समिती चे तेलंगे साहेब, संतोष साबळे, विलास रोकडे, उबाळे साहेब, तसेच खेड, आंबेगाव, जुन्नर व शिरूर तालुक्यातील पत्रकार बांधव आवर्जून उपस्थित होते. भोजन करून आनंदी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खेड तालुका अध्यक्ष डॉ देवेंद्र ओव्हाळ, सुधाकर अभंग (कार्यध्यक्ष), सुनील शांताराम वाघचौरे (उपाध्यक्ष), राहुल बबन सोनवणे (सचिव), गणेश सावंत (सह सचिव), सचिन साबळे (खजिनदार), विकास शिंदे (सह खजिनदार), गणेश वाळुंज (संघटक), वेदांत ओव्हाळ (संपर्क प्रमुख), रोहिदास रणपिसे (सदस्य) आदी राज्य मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्र प्रदेश, खेड तालुका सर्व पदाधिकारी कार्यकारणी यांनी परिश्रम घेतले.



# आमठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली शिंदे यांची पि.जी.साठी निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर**
**सिल्लोड** - प्राथमिक आरोग्य केंद्र आमठाणा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सायली शिंदे यांची पोस्ट ग्रॅज्युएशन ( पी.जी) साठी के.इ.एम. रुगणालय मुंबई येथे निवड झाल्याबद्दल शनिवार ( दि.१) रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. डॉ.सायली शिंदे या प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. कोविड काळात त्यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने उत्कृष्ट कार्य केले होते.या शिवाय लसीकरण मोहीम,आरोग्य शिबीर, जनजागृती मोहीम यामधे यशस्वी कार्य केले.डॉ.सायली शिंदे यांची पोस्ट ग्रॅज्युएशन ( पी.जी ) साठी के.इ.एम.हॉस्पीटल मुंबई येथे निवड झाली.आमठाणा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने डॉ.सायली शिंदे यांचा आई- वडिलांसह सत्कार करुन, भेटवस्तु देण्यात आली.तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.सत्कार प्रसंगी कृतज्ञता व्यक्त करत सर्व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले. प्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ नासेर खान, सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग शिंदे, शिक्षीका दिपा शिंदे ( तायडे) सेवानिवृत्त शिक्षक राजेंद्र चव्हाण,डॉ प्रतिक सुराणा,डॉ.श्वेता सुराणा, यांच्या सह आरोग्य कर्मचारी, समुदाय



# मानवतेचा संदेश देणारा पवित्र रमजान महिन्यास उत्साहाने सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
सिल्लोड :- देशभरात अनेक ठिकाणी चंद्र दर्शन झाल्यामुळे ( दि.२ मार्च) रविवार पासून मुस्लिम बांधवांच्या पवित्र अशा 'रमजान' महिन्यास सिल्लोड तालुक्यात अतिशय उत्साहाने व नवचैतन्याच्या वातावरणात सुरुवात झाली असून, पहिला रोजा मोठ्या उत्साहात पाळला गेला. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत प्रत्येक जण या उपवासात सहभागी पहावयास मिळाला. पवित्र रमजान महिन्यात अगदी सकाळी पहाटे पाच वाजता सूर्योदयापूर्वी सहारी करून रोजा (उपवास) ठेवला जातो. त्यानंतर दिवसभर काहीही न खाता-पिता अल्लाहाची उपासना करावी. त्यात मुस्लिम धर्माचे पवित्र धर्मग्रंथ कुराण शरीफ चे पठण करावे. दिवसातून पाच वेळेस नमाज पढावी तसेच सूर्यास्ताच्या वेळी



रोजा अल्लाहच्या साक्षीने पेंडखजुर ने सोडावा. ईशाच्या नमाज नंतर तराविहच्या नमाजाची तयारी मुस्लिम बांधव करतात. तराविह नमाज मध्ये पवित्र धर्मग्रंथाचे पठण करतात.

पवित्र रमजान महिन्यात मोठ्या पासून तर चिमुकल्यांपर्यंत मोठ्या उत्साहाने व नवचैतन्याचे वातावरण असते. परंतु यावेळी पवित्र रमजान महिना कडक उन्हाळ्यात असल्याने रोजेदारांचा चांगलाच कस लागणार आहे. तरीही रोजेदार बांधव अल्लाहच्या निष्ठेप्रती कडक उन्हात सुद्धा रोजे ठेवून निष्ठा ठेवतात हे विशेष!

"खजुरांचे अनेक प्रकार बाजारात दाखल"" रमजान महिन्यात इफ्तारला खजूर खाऊन रोजा सोडला जातो. त्यामुळे विशेषतः अरबी देशातून येणाऱ्या खजुराला अधिक पसंती मिळत आहे.८० रुपयांपासून ५०० रुपये प्रति किलो प्रमाणे विविध प्रकारची खजुराची विक्री होत असल्याची माहिती एका विक्रेत्यांनी दिली. खजूर सेवन करण्यास धार्मिक व शास्त्रीय कारण आहे. निर्जल रोजा करताना शरीरातील थकवा नाहीसा करण्यासाठी असलेले जीवनसत्व यातून मिळते. मुस्लिम बांधवांकडून अजूनही ती संस्कृती जपली जात आहे. त्यामुळे रमजान मध्ये सर्वात पहिला कल खजूर खरेदी कडे पाहावयास मिळाला.

" जातीय सलोखा,एकता, बंधुभाव ऐक्याचे दर्शन " पवित्र रमजान महिन्याचे रोजे महिनाभर ठेवून इतर जाती - धर्मीय बांधव सुद्धा रमजान महिन्याचे रोजे ( उपवास ) ठेवतात. म्हणजेच यामधून जातीय सलोखा, विविधतेत एकता, बंधुभाव व ऐक्याचे दर्शन घडते. पवित्र रमजान महिन्यात मानवतेच्या भिंती उभारून आपसातील मतभेद बाजूला करून मनातील द्वेष विसरून केवळ मानवता हाच धर्म समजून सर्व देशवासीयांनी एकत्रित रित्या राहण्याचा संदेश पवित्र रमजान महिना सर्व भारतीय नागरिकांना देत आहे. पवित्र रमजान महिन्याचे रोजे ठेवून अल्लाहची ईबादत व पवित्र धर्मग्रंथाची तिलावत करणे, मानवतेचा संदेश तळागाळातील जनतेस पोहोचविणे,तहानलेल्या, दीनदुबळ्या ,भुकेल्या लोकांची मदत करणे हा पवित्र महिना सर्व जनतेस मोलाचा संदेश देतो असे केल्यानेच मानवी जीवन सफल होईल

**-इस्माईल मौलाना**
**ईमाम जामा मस्जिद,पालोद**

# अल्लाहच्या मर्जीसाठी रोजा

रमजान महिन्याचे रोजे फर्ज (अनिवार्य) असल्यामुळे त्यास खूप महत्व आहे.रोजा ही एक प्रकारची प्रार्थना (इबादत) आहे. सर्व प्रार्थना या अल्लाह साठीच आहेत.मात्र रोजाचा मोबदला साक्षात ईश्वरच देणार असल्याने त्याला विशेष महत्व आहे.कारण कुरआन शरीफ मध्ये अल्लाहने म्हटले आहे कि "रोजा मेरे लिए है और मै ही इसका अज्र दूंगा." या वरुन रोजाचे महत्व लक्षात येते. रोजेदारासाठी अल्लाहने विशेष प्रकारच्या सुविधा निर्माण केल्या आहेत. जसे स्वर्गाच्या आठ प्रवेशद्वारांपैकी एक द्वार बाबुल रय्यान हे फक्त रोजेदारांसाठीच निर्मिले आहे.रोजेदारांसाठी सृष्टीतील सर्व सजीव दुआ करतात.समुद्रातील मासे सुध्दा दुआ करतात.रोजेदाराच्या मुखाची दुर्गंधी देखील कस्तुरीपेक्षा अधिक खुशबुदार (सुवासिक) असते. रमजान महिन्याचे रोजे अनिवार्य



करण्यामागे अल्लाह तआलाचा हेतू खूप उदात्त आहे.

**रमजानुल मुबारक - २**

प्रत्येकाच्या अंगी सर्व सगुण निर्माण व्हावेत, वाईट गुणांचे क्षालन व्हावे,जे जे चांगले आहे त्याची जोपासना व्हावी, मानवाला सर्व प्रकारच्या शारीरिक,मानसिक, नैतिक,चारित्र्यात्मक बाबी उपलब्ध व्हाव्यात व यातून एक सुशील चारित्र्यवान समाज निर्माण व्हावा, प्रत्येकाच्या जीवनात सृजनात्मक, भावनाशील,सदाचारी, उच्च प्रतिच्या गुणांनी संपन्न वृत्ती निर्माण होऊन सर्व गुणसंपन्न, सुदृढ समाज निर्मिती अस्तित्वात यावी. यासाठी रोजे किंवा उपवासाची निर्मिती झाली आहे.फक्त उपाशी राहणे व शरीराचे संतुलन निर्माण करणे एवढाच रोजाचा हेतू नाही तर दैनंदिन जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेत विवेकाचा उपयोग करून आपले जीवन संपन्न कसे जगता येईल यासाठी आवश्यक सद्गुणांची जोपासना आपल्या अंगी व्हावी व त्याप्रमाणे आपले वर्तन असावे यासाठी रोजाची आदर्श आचारसंहिता निर्माण केली गेली आहे. रोजेदाराकडून कुठल्याही प्रकारचे वाईट वर्तन अपेक्षित नाही. महिनाभर उपवास करून चांगल्या सवयी अंगी बाणल्या जातात व त्यापुढे सुरु राहिल्याने एक आदर्श व्यक्तिमत्व निर्माण होते.रोजे फक्त मुस्लीमांसाठी नाही. चांगल्या सवयींची अभिलाषा बाळगणारी कोणतीही व्यक्ति रोजे धरू शकते. महिनाभराचे पूर्ण रोजे करणारे अनेक तर शेवटच्या टप्प्यात काही मोठे रोजे धरणारे शेकडो हिंदू बांधव आपल्या समाजात आहेत. परमेश्वराला जातीधर्मापेक्षा मानवता धर्म वाढीस लावणारे लोक अधिक प्रिय आहेत.रोजा हा मानवता धर्म ( इन्सानियत) वाढीस लावणारा प्रकार आहे.**(क्रमशः)**

**सलीमखान पठाण**

# महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी यांच्या जन्मदिनानिमित्त डोंबिवलीत स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )**
महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी यांच्या जन्मदिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल यांचेकडून 'स्वच्छतादूत म्हणून सन्मानित डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे अध्यक्षा पद्मश्री श्री दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा दत्तात्रेय धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान रविवार दिनांक ०२ मार्च २०२५ रोजी डोंबिवली शहर व परिसर येथे पार पडले.



हे प्रतिष्ठान स्वच्छता अभियानासारख्या जनजागृती उपक्रमाबरोबर एकूण ४६ प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम जसे वृक्ष लागवड व संवर्धन, जल पुनर्भरण, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, कॅन्सर अवेअरनेस, प्लाजमा डोनेशन, निर्माल्य संकलन आणि खत निर्मिती इत्यादी उपक्रम राबविते.या प्रतिष्ठानाचे कार्य केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरील अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापुर, कतार, दुबई या राष्ट्रांमध्येही राबवले जाते.

८ ऑक्टोबर १९४३ पासून डॉ. श्री. नानासाहेब यांनी श्रीबैठका सुरू केल्या. तेव्हापासून आजतागायत या बैठकांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य अविरत सुरू आहे. अंधश्रदधा निर्मुलन, व्यसनमुक्तता आदी कार्यांबरोबर समाजातील सर्व स्तरातील स्त्री, पुरूषांना बैठकीच्या तसेच लहान मुलांना बालसंस्कार मार्गदर्शन वर्ग यांच्या माध्यमातून मानवी नितीमुल्यांची जोपासना कशी करावी याची शिकवण देण्याचे कार्य आज ८२ वर्षे निष्काम भूमिकेतून सुरू आहे.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा ता. अलिबाग जि. रायगड तर्फे आयोजित स्वच्छता अभियानात एकूण २९६५ श्रीसदस्यांनी सहभाग घेतला. ओला व सुका कचरा मिळून एकूण २९ टन घनकचरा उचलण्यात आला. एकूण ९६ किलोमीटर रस्ते सफाई करण्यात आली.हे स्वच्छता अभियान फक्त डोंबिवली शहर विभागापुरतेच नसून संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील राज्यांमधूनही पार पडले. मानवी आरोग्यासाठी जशी शुद्ध हवा, शुद्ध पाणी हवे असते, तसेच पर्यावरणाचे होणारे प्रदूषण याची जाणीव सर्वसामान्यांना होणे तसेच अस्वच्छतेमुळे अनेक प्रकारचे आजार व साथीचे रोग पसरतात व त्यासाठी औषधोपचार मोठ्या प्रमाणात खर्च करणे भाग पडते, काही वेळेस जीवित हानी सुद्धा होते याबाबतची जनजागृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे या हेतूने या स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.